## प्रेसनोट दि. २६.०३.२०२१

श्री. प्रदिप पोपट झालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विटा पोलीस ठाणे, श्री. विवेक पांडुरंग यादव, वय २८ वर्ष, पोलीस कॉन्स्टेबल बंनं २४१ नेम. विटा पो. ठाणे व अकीब फिरोज तांबोळी वय २३ वर्ष खाजगी इसम यांना एक लाख रूपयाची लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे खाजगी ठिकाणी दिवानजी म्हणून काम करतात, तक्रारदार यांचे मालका विरूध्द विटा पोलीस ठाणे येथे आत्महत्तेस प्रवृत्त केलेचा गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचे कामी तक्रारदार यांचे मालकांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्ह्यास सहकार्य करण्यासाठी व वाढीव पोलीस कस्टडी न मागण्याकरीता विटा पोलीस ठाणे येथील श्री. झालटे सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच श्री. यादव पोलीस कॉन्स्टेबल यांनी तक्रारदार यांचेकडे १५००००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.२५.०३.२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २५.०३.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. झालटे सहाय्यक पोलीस निरीक्षक तसेच लोकसेवक श्री. यादव पोलीस कॉन्स्टेबल यांनी तक्रारदार यांचेकडे १,५०,०००/- रूपये लाच मागणी करून १,०००००/- रूपये दि.२६.०३.२०२१ रोजी आणून देण्यास सांगितलो असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.२६.०३.२०२१ रोजी विटा पोलीस ठाणे या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. प्रदिप पोपट झालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विटा पोलीस ठाणे यांनी व श्री. विवेक पांडुरंग यादव, पोलीस कॉन्स्टेबल यांनी तक्रारदार यांचेकडे १,५०,०००/- रूपयाची लाचेची मागणी केली तसेच श्री. विवेक पांडुरंग यादव, पोलीस कॉन्स्टेबल यांचे सांगणेवरून खाजगी इसम अकीब फिरोज तांबोळी यांनी तक्रारदार यांचेकडून १,०००००/- रूपये स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

यातील श्री. विवेक पांडुरंग यादव, वय २८ वर्ष, पोलीस कॉन्स्टेबल बंनं २४१ नेम. विटा पो. ठाणे व अकीब फिरोज तांबोळी वय २३ वर्ष खाजगी इसम यांना ताब्यात घेतले असून यातील लोकसेवक श्री. प्रदिप पोपट झालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विटा पोलीस ठाणे हे फरार आहेत.

त्या अनुषंगाने श्री. प्रदिप पोपट झालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विटा पोलीस ठाणे- वर्ग २, श्री. विवेक पांडुरंग यादव, वय २८ वर्ष, पोलीस कॉन्स्टेबल बंनं २४१ नेम. विटा पो. ठाणे वर्ग ३ व अकीब फिरोज तांबोळी वय २३ वर्ष खाजगी इसम यांचे विरुध्द विटा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार, संजय कलकुटगी, अविनाश सागर, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, संजय संकपाळ, सलीम मकानदार, भास्कर भोरे, राधिका माने, रविंद्र धुमाळ, सिमा माने, श्रीपती देशपांडे, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

Scanned by CamScanner